ePaper **“नितीन देसाईंना अनेकांनी ब्लॅकमेल केलं”: जितेंद्र आव्हाड**



| वर्ष - 7 | अंक - 93 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- बारामती प्रशासनाचा 'मास्टर प्लॅन'
- मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर काच वाहतूक करणाऱ्या ट्रकचा अपघात
- मेट्रोशी संलग्न फिडर बससेवेचा शुभारंभ!


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 3 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अनधिकृत मोबाइल टॉवर्स होणार ‘अधिकृत’!



## महसुलासाठी वाट्टेल तेः शहरातील 390 अनधिकृत मोबाइल मनोरे दंड आकारून होणार अधिकृत

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपाचेपिंपरी-चिंचवड शहरातील ३९० अनधिकृत मोबाइल मनोरे दंड आकारून अधिकृत करण्यात येणार आहेत. दरवर्षी कोट्यवधींचे परवानगी शुल्क, मिळकतकर बुडत असल्याने या मनोऱ्यांना निश्चित दंड करून अधिकृत करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. गेल्या काही वर्षांत पिंपरी-चिंचवडमध्ये मोबाइल मनोऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. मोबाइल, इंटरनेटचा वापर वाढल्याने कंपन्यांनी शहरातील विविध भागांतील इमारतींवर आणि नागरी वस्तीत मोबाइल मनोरे उभारण्यात आले आहेत.**

शहरात सध्या ५३३ अधिकृत, तर ३९० अनधिकृत असे एकूण ९२३ मोबाइल मनोरे आहेत. मोबाइल मनोरे न पाडण्याबाबत न्यायालयाच्या निर्देशामुळे महापालिकेला अनधिकृत मनोऱ्यांवर कारवाई करता येत नसल्याने महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधींचे परवानगी शुल्क, मिळकतकर बुडत आहे. हा प्रकार रोखण्यासाठी अनधिकृत मोबाइल मनोऱ्यांना निश्चित दंड करून ते अधिकृत केले जाणार आहेत.

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ तसेच, विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन केल्याप्रकरणी तडजोड शुल्क आकारून अशा बाबी नियमित करण्यास मान्यता देण्यात येते. तसा ठराव महापालिका सर्वसाधारण सभेने १९ मे १९९७ ला मंजूर केला आहे. त्यासाठीच्या शुल्काचे दर निश्चित केले आहेत. या दरामध्ये वेळोवेळी बदलही करण्यात आले आहेत. या अनुषंगाने अनधिकृत मोबाइल मनोरे नियमित करण्यासाठी आयुक्तांच्या मान्यतेने तडजोड शुल्काचे दर निश्चित केले आहेत. तडजोड शुल्काच्या दरात केलेल्या बदलास सर्वसाधारण सभेची मान्यता नसल्याने दर निश्चित करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्याचा प्रस्ताव बांधकाम परवानगी विभागाने सादर केला होता. या प्रस्तावाला आयुक्तांनी मान्यता दिल्याने अनधिकृत मोबाइल मनोऱ्यांना दंड करून अधिकृत करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



> “शहरात ३९० मोबाइल मनोरे अनधिकृत आहेत. यापूर्वी अनधिकृत मनोऱ्याला एक लाख रुपये प्रशमन शुल्क, दहा हजार रुपये प्रशासकीय शुल्क आणि आकारानुसार विकास शुल्क आकारून नियमित करण्यात येत होते. मात्र, आता अनधिकृत मोबाइल मनोरे नियमित करण्यासंदर्भात शुल्क निश्चित करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात आले आहेत.
>
> **-मकरंद निकम,** शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

# पिंपरी-चिंचवडमध्ये डोळे येण्याच्या साथीचा उद्रेक!

## बारा दिवसांत शहरातील 2 हजार 723 जणांना प्रादुर्भाव

। पिंपरी ।महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड शहरात डोळे येण्याच्या साथीचा उद्रेक झाला आहे. गेल्या बारा दिवसांत शहरातील २ हजार ७२३ जणांना प्रादुर्भाव झाला असून, त्यात शाळकरी मुलांचे प्रमाण अधिक आहे. दररोज तीनशेहून अधिक जणांना लागण होत आहे. बुधवारी दिवसभरात ४३७ जणांना प्रादुर्भाव झाला आहे. वातावरण बदलामुळे डोळे



येण्याची साथ आली आहे. सुरुवातीला आळंदीत साथ आली होती. त्यानंतर पिंपरी-चिंचवडमध्येही या साथीचा प्रादुर्भाव दिसू लागला. डोळ्यांचा विषाणू संसर्ग हा मुख्यत्वे अ‍ॅडिनो विषाणूमुळे होतो. महापालिकेने २० जुलैपासून डोळे लागण होणाऱ्या रुग्णांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. त्यानुसार गेल्या १२ दिवसांत २ हजार ७२३ जणांना प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले. लागण झालेल्या रुग्णांपैकी एकाही जणाला रुग्णालयात दाखल करावे लागले नाही. आतापर्यंत लागण झालेल्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण शालेय विद्यार्थ्यांचे आहे. त्यामुळे महापालिकेचे वैद्यकीय पथक शाळेत जाऊन मुलांची तपासणी करत आहे. डोळे आलेल्या व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळावे. डोळ्याला वारंवार हात लावू नये. नियमित हात धुवावेत. एकापासून दुसऱ्या व्यक्तीला हा संसर्ग वेगाने होतो.

> “डोळे येण्याच्या साथीच्या आजाराचा प्रादुर्भाव शालेय विद्यार्थ्यांमध्ये जास्त आहे. शाळेतील पाचपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना लागण झाली असल्यास त्याबाबत वैद्यकीय विभागाला माहिती देण्याच्या सूचना शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्राद्वारे दिल्या आहेत. शाळेने तपासणीसाठी बोलवल्यास वैद्यकीय विभागाचा चमू शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी करत आहे. सर्वाधिक प्रादुर्भाव असलेल्या भागाचे सर्वेक्षण केले जात आहे. सर्व रुग्णालयांसह मासुळकर कॉलनीतील डोळ्यांच्या रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. आतापर्यंत एकही रुग्ण रुग्णालयात दाखल झालेला नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जावू नये.
>
> **-डॉ. अभयचंद्र दादेवार,**
> अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

# बारामती प्रशासनाचा 'मास्टर प्लॅन'

## » कचरा वेचक महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी घेतला मोठा निर्णय

। बारामती । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी नागरिक, संस्था किंवा संघटनांचे योगदान महत्त्वाचे आहे. स्वच्छतेच्या 'मास्टर प्लॅन'मुळे शहराला लागलेला अस्वच्छतेचा डाग काढण्यात नगरपरिषद प्रशासनाला यश आले आहे. कचरावेचक महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केलेल्या नियोजनामुळे आरोग्याचा प्रश्न मार्गी लागून या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत. त्यांच्या मासिक उत्पन्नात वाढ झाली आहे.**



### महिलांचा मोठा सहभाग

देशाच्या स्वच्छ सर्वेक्षणात बारामतीने नुकतीच बाजी मारली आहे. स्वच्छतेत कायम सातत्य ठेवण्यामध्ये कचरावेचक महिलांचा मोठा सहभाग आहे. कचरा वर्गीकरण प्रक्रियेत या महिलांचा सहभाग वाढविण्यात आला आहे. नगरपरिषद एका कंपनीच्या माध्यमातून कचरा वर्गीकरणातील कचरा जागेवरच खरेदी करते. त्यामुळे हाताने वर्गीकरण करून मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा अधिक मोबदला या महिलांना मिळत असल्याने त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत.

### 'आता जागेचा प्रश्न

रुई, तांदुळवाडी आणि जळोची येथे तीन सांडपाणी प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. शहरात असणारा कचरा डेपो हद्दपार झाला आहे. केवळ सध्याचा रोजचा संकलित होणारा करण्यासाठी व प्रक्रिया करण्यासाठी जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्यामुळे यासाठी जागा उपलब्ध होत नाही. भविष्यातील ३० वर्षांचे नियोजन करून हा 'मास्टर प्लॅन' तयार केला असल्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी 'मटा'ला सांगितले.

### शहरात बायोगॅस प्रकल्प

मोठ्या हॉटेलांतील निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅसनिर्मिती सुरू झाली आहे. शहरात २० मिनी बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. २० कुटुंबे राहत असलेल्या सोसायटीत निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून रोज पाच व्यक्तींच्या कुटुंबासाठी लागणारा गॅस निर्माण होत असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

### कृती दलाची स्थापना

**» स्वच्छ सर्वेक्षणात राज्यात प्रथम येण्यासाठी बारामती नगरपरिषदेने प्लास्टिकचा वापर आणि त्यावर बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना केली आहे. प्रत्येक घरासमोर घंटागाडीचे नियोजन करण्यात आले आहे. संकलित होणाऱ्या ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी शहरात एक बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आला असून, दुसरा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे.**

" विक्री डेपोवर काम करणाऱ्या कचरा वेचक महिलांच्या मार्फत केली जाते. त्यामधून त्यांना आर्थिक उत्पन्न प्राप्त होत आहे. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे नियोजन प्रगतीपथावर आहे.

**- -महेश रोकडे,** मुख्याधिकारी, बारामती

" बारामती नगरपरिषदेने आमचा विचार करून आम्हाला काम दिले आहे. ओल्या कचऱ्यामुळे होणारा त्रास कमी झाला आहे. आमच्या बँक खात्यात पैसे जमा होत असल्याने समाधानी आहोत.

**-ताराबाई सुतार,** कचरावेचक महिला

---

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर काच वाहतूक करणाऱ्या ट्रकचा अपघात

## » रस्त्यावर चुराडा, एकाचा मृत्यू : अपघातानंतर महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर बोरघाट पोलीस चौकीजवळ सकाळच्या सुमारास दोन ट्रकचा मोठा अपघात झाला. या अपघातात एकाचा मृत्यू झाला. एका अपघातग्रस्त ट्रकमधून काचेची वाहतूक केली जात होती. त्यामुळे त्यातील काचा फुटून महामार्गावर पसरल्या होत्या. या अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. मात्र सध्या दोन्ही लेन सुरु आहेत.**

मुंबई - पुणे एक्स्प्रेस वेवर आज पहाटेच्या सुमारास मोठा अपघात झाला. पुण्याहून मुंबईकडे जाताना हा अपघात झाला. चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला असल्याची माहिती समोर आली आहे. अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर अपघातग्रस्त गाड्या महामार्गावरून हटवण्यात आल्या.

अपघातात एकाला प्राण गमवावे लागले, तर पोलिसांनी या अपघातातील जखमीला जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे. अपघात झाल्यानंतर रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. अपघातानंतर हा ट्रक उलटल्यामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद झाली होती.

मागील काही दिवसांपासून मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघाताचे प्रमाण, दरडी कोसळण्याचे प्रकार घडत आहेत.

कालच खंडाळा घाटाच्या बोगद्यात कंटेनर उलटल्याने वाहतूक वळवावी लागली होती. दुपारनंतर हा कंटेनर बोगद्यातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. मात्र आज सकाळच्या सुमारास पुन्हा अपघात झाल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

या अपघातानंतर महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मुंबईकडे जाणारी वाहतूक उर्से टोल नाका आणि खंडाळा घाटात वाहतूक काही वेळ थांबविण्यात आली होती. मात्र सलग अपघात होत असल्याने प्रावशी नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



# मेट्रोशी संलग्न फिडर बससेवेचा शुभारंभ!

## पिंपरी ते घरकुल चिखली, पिंपरी ते काळेवाडी फाटा या दोन मार्गावर बस धावणार

## नागरिकांनी अधिकाधिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे आयुक्तांचे आवाहन

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शहरातील सार्वजनिक दळणवळण व्यवस्था एकमेकांशी संलग्न असल्यास नागरिकांना प्रवासासाठी फायदेशीर ठरणार आहे, या हेतूने पीएमपीएमएलने पिंपरी चिंचवड शहरात पिंपरी मेट्रो स्टेशन पासून मेट्रोशी संलग्न बस सेवा सुरू केली असुन सार्वजनिक दळणवळण व्यवस्था सक्षम करण्यासाठी पीएमपीएमएल सतत प्रयत्नशील राहील, असे प्रतिपादन पीएमपीएमएलचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सचिंद्र प्रताप सिंग यांनी केले. पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या वतीने मेट्रोला संलग्न असलेली पिंपरी चिंचवड शहराकरिता उपयुक्त अशी चक्राकार बस सेवा सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीला निश्चितपणे अधिक चालना मिळेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हा वाहतूक समस्येवर प्रभावी उपाय असून, नागरिकांनी अधिकाधिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले.**

या सेवेचा शुभारंभ पिंपरी मेट्रो स्थानकापासून आज महापालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमपीएमएलचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सचिंद्र प्रताप सिंग आणि महा मेट्रोचे व्यवस्थापन आणि संचालक विनोद कुमार अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे, उप आयुक्त रविकिरण घोडके, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, वाहतूक प्रकल्प नियोजन कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता प्रेरणा सिनकर, संध्या वाघ, जहिरा मोमीन, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पीएमपीएमएलचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे, महा मेट्रोचे मल्टी मॉडेल इंटिग्रेशन कक्षाचे उपमहाव्यवस्थापक मनोज कुमार डॅनियल, संचालन कक्षाचे उपमहाव्यवस्थापक निशांत गायकवाड यांच्यासह महा मेट्रो, महापालिका आणि पीएमपीएलचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

महामेट्रोच्या मार्गिका क्रमांक -१ करीता पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीत पीएमपीएमएल मार्फत फिडर बस सेवा आजपासुन सुरु करण्यात आली. यावेळी आयुक्त शेखर सिंह म्हणाले, नुकताच पिंपरी ते पुणे सिविल कोर्ट असा महा मेट्रोचा मार्ग सुरू झाला आहे. कमीत कमी वेळेत सुखकर आणि सुरक्षित प्रवास या माध्यमातून नागरिकांना करता येणार आहे. प्रवासाचा वेळ वाचवण्यासाठी पीएमपीएमएलची संलग्न बस सेवा उपयुक्त ठरणार आहे. रिक्षा सायकल आणि पायी चालणे अशा संलग्न वाहतुक पद्धतीचा वापर करून भविष्यात उद्भवणाऱ्या वाहतूक समस्येवर सक्षमपणे पर्याय निर्माण करणे गरजेचे आहे.

पिंपरी चिंचवड शहरात आज जरी वाहतूक समस्या अधिक नसली तरी सार्वजनिक दळणवळण व्यवस्थेचा नागरिकांनी वापर केल्यास खाजगी वाहने रस्त्यावर येण्याचे प्रमाण घटेल. पर्यायाने भविष्यातील वाहतूक समस्या दूर होण्यास मदत होईल. पर्यावरणासाठी देखील ते उपयुक्त ठरणार आहे.



विनोद कुमार अग्रवाल म्हणाले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पी एम पी एम एल यांनी पुढाकार घेऊन मेट्रोला संलग्न असलेली बस सेवा सुरू केली. सार्वजनिक दळणवळणाचा अधिक वापर होण्याच्या दृष्टीने ही चांगली गोष्ट असून या सेवेच्या वापरामुळे प्रवाशांचा वेळ वाचणार आहे तसेच पैशांचीही बचत होणार आहे.

### फिडर बसचे अनोख्या पद्धतीने उद्घाटन

**फिडर बसचे आज अनोख्या पद्धतीने उद्‌घाटन करण्यात आले. पीएमपीएमएलचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक सचिंद्र प्रताप सिंग हे मेट्रोने प्रवास करत पीसीएमसी मेट्रो स्थानकावर पोहोचले. आयुक्त शेखर सिंह यांनी त्यांचे स्वागत केले. यानंतर सचिंद्र प्रताप सिंग, शेखर सिंह आणि विनोद कुमार अग्रवाल यांनी पिंपरी ते घरकुल चिखली या दरम्यान धावणाऱ्या चक्राकार पीएमपीच्या बसला हिरवा झेंडा दाखवून फिडर बस सेवेचा शुभारंभ केला आणि बसमधून प्रवास केला. त्यांच्या समवेत उपस्थित अधिकारी, कर्मचा-यांनी रितसर तिकीट काढून प्रवास केला. पीएमपीएमएलने पिंपरी ते घरकुल चिखली तसेच पिंपरी ते काळेवाडी फाटा अशा दोन मार्गावर चक्राकार बस सेवा सुरु करण्यात आली आहे.**

---

# पालिकेच्या नवीन इमारतीचे काम सुरू असलेल्या ठिकाणी ब्लास्टिंगची डेन्सिटी कमी करा!

## भाजपचे अमित गोरखे यांची आयुक्तांकडे मागणी

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन इमारतीचे काम सुरू आहे. त्याठिकाणी होत असलेल्या ब्लास्टिंगची डेन्सिटी कमी करावी अशा मागणीचे निवेदन भाजपचे पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिले आहे..**



अमित गोरखे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चिंचवड येथील ऑटो क्लस्टरच्या समोरील जमिनीवर सध्या पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन इमारतीचे खोदकाम चालू आहे. या खोदकामात वापरल्या जाणाऱ्या ब्लास्टिंगमुळे शेजारील एम्पायर स्क्वेअर या इमारतीच्या रहिवाशांना त्रास होत असून या ब्लास्टिंगच्या हेवी डेन्सिटीमुळे इमारतीला तडे बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. या ब्लास्टिंगमुळे काही काचा तुटण्याचा प्रकार नुकताच घडला. तसेच सकाळी लवकर काम चालू होऊन रात्री उशिरापर्यंत चालत असल्याने त्या आवाजाचा त्रासही या इमारतीधारकांना होत आहे.

एम्पायर स्क्वेअर समितीच्या वतीने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले. याविषयी आयुक्तांनी त्वरित अधिकाऱ्यांना बोलावून घेऊन चर्चा करून आदेश दिले आहेत.

---

# अखेर निगडीपर्यंत मेट्रो धावण्याचा मार्ग मोकळा

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी ते निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो धावण्याचा मार्ग अखेर मोकळा होणार आहे. निगडीपर्यंतच्या मेट्रोचा राज्य सरकारचा प्रस्ताव आपल्याकडे आला आहे. त्या प्रस्तावाला येत्या दिवसाच्या आत मान्यता देण्याचे आश्वासन केंद्रीय शहरी विकास मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दिले असल्याचे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. त्यामुळे निगडीपर्यंत मेट्रो धावण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे बारणे म्हणाले.

पहिल्या टप्प्यात पिंपरी-चिंचवड महापालिका ते फुगेवाडी हा मेट्रो मार्ग होता. आता पिंपरी-चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय हा १३.९ किलोमीटरचा मार्ग सुरू झाला आहे. पिंपरी नव्हे निगडीपर्यंत मेट्रो सुरु करण्याची शहरवासीयांची मागणी आहे. खासदार बारणे यांच्या पाठपुराव्याने राज्य शासनाने निगडीपर्यंतच्या मेट्रोचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता. त्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी खासदार बारणे यांनी आज (गुरुवारी) संसद भवनात मंत्री हरदीप सिंग पुरी यांची भेट घेतली. निगडीपर्यंतच्या मेट्रोला मान्यता देण्याची विनंती केली. त्यावर येत्या सात दिवसात मान्यता देण्याचे आश्वासन मंत्री पुरी यांनी दिले.

# शतायुषी नागपूर विद्यापीठ




**छत्तीसगड, जबलपूर, रायपूर, विदर्भ आणि वऱ्हाड प्रांत असा या विद्यापीठाचा असलेला पसारा कालौघात कमी झाला, तरी गुणवत्ता आणि उपयुक्तता वाढतच गेली... उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत होणाऱ्या शताब्दी कार्यक्रमाच्या निमित्ताने या विद्यापीठाच्या इतिहासाचे स्मरण...**

एखादी संस्था १०० वर्षाचा टप्पा पार करत असेल ही त्याच्याशी संबंधित घटकांसाठी फार मोठी अभिमानाची बाब ठरते. पारतंत्र्यात उदयाला आलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही कालोचित पैलूंनी विकसित होत आहे. कितीतरी उमलत्या मनांना या ज्ञानसंस्थेने आकार दिला आहे. कित्येकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करीत नवे आकाश, नवे क्षितिज दिले आहे. यंदाच्या ४ ऑगस्टला शंभर वर्षे पूर्ण करणाऱ्या नागपूर विद्यापीठाचा इतिहास देखील गौरवशालीच राहिला आहे. या विद्यापीठातून शिक्षण घेत अनेक नामवंत निर्माण झाले आहे. नवीन संकटे तसेच आव्हानांचा सामना समर्थपणे करीत विद्यापीठाचा विकास अधिक भरभराटीने होताना दिसत आहे. ४ ऑगस्ट १९२३ रोजी नागपूर विद्यापीठाची स्थापना झाली. मात्र त्यापूर्वी जवळपास २० वर्षे त्यासाठी प्रयत्न होत होते. १९१४ च्या सुमारास त्या दिशेने पहिले पाऊल पडले.




सॅंडलर कमिशनच्या अहवालानंतर एका अधिकृत समितीची स्थापना झाली आणि विद्यापीठाची निर्मिती करण्याबाबत प्राथमिक प्रयत्नांना आरंभ झाला. पहिल्या महायुद्धाची झळ पोहोचली असताना १९२० नंतर या प्रयत्नांना पुन्हा चालना मिळाली. छत्तीसगड, जबलपूर, रायपूर, विदर्भ आणि वऱ्हाड प्रांत या विशाल भागासाठी एक विद्यापीठ स्थापन करण्याचे निश्चित झाले. १९२३ साली संमत झालेल्या कायद्यानुसार नागपूर विद्यापीठ अस्तित्वात आले. मध्य प्रांताचे सरकार आणि त्यामधील शिक्षण मंत्री रावबहादुर एन. के. केळकर यांचे यात मोठे योगदान होते. सर फ्रॅंक स्लाय यांच्यासारखे कुलपती आणि सर बिपिन कृष्ण बोस यांच्यासारखे संस्थापक कुलगुरू विद्यापीठाला लाभले. विद्यापीठ म्हणजे सरकारचे एक डिपार्टमेंट नव्हे. 'विद्यापीठाचा प्रमुख उद्देश व कार्य म्हणजे शिकवणे आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे हे होय.' ही स्वातंत्र्यपूर्व काळात विद्यापीठाच्या धोरणाची प्रमुख सूत्रे होती. विद्यापीठाची अत्यंत साधेपणाने सुरुवात झाली. विद्यापीठाची निर्मिती झाली त्यावेळी प्रथम दोन महत्त्वाची पदे निर्माण करण्यात आली. एक कुलगुरूंचे आणि दुसरे कोषाध्यक्षांचे. बिपिन कृष्ण बोस हे पहिले कुलगुरू तर व्ही. एम. केळकर हे पहिले कोषाध्यक्ष होते. सर जमशेदजी टाटा यांनी दिलेल्या एक लाख रुपयांच्या देणगीतून विद्यापीठाची मूळ वास्तू उभी राहिली. १९३५ च्या सुमारास विद्यापीठाला एक प्रकारची स्थिरता प्राप्त झाली. त्यानंतर संवर्धनाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. भौगोलिकदृष्ट्या फार मोठा भूप्रदेश विद्यापीठाच्या अधिपत्याखाली येत असला तरी प्रत्यक्षात हाताच्या बोटावर मोजता येईल एवढीच महाविद्यालये संलग्न होती. यामध्ये मॉरिस कॉलेज, हिस्लॉप कॉलेज, किंग एडवर्ड कॉलेज, रॉबर्टसन कॉलेज आणि स्पेन्सर ट्रेनिंग कॉलेज यांचा समावेश होता. सहा महाविद्यालये, ९१७ विद्यार्थी आणि ४ विद्याशाखा हे विद्यापीठाचे आरंभीचे चित्र होते. विद्यापीठासाठी जागा नसल्याने नागपूरकरांच्या दातृत्ववृत्तीला आवाहन करण्यात आले. सुरुवातीला जेथे जागेचा प्रश्न होता तेथे आज २६३ एकर जागेवर विद्यापीठाचा भव्य परिसर आहे. अनेक आकर्षक आणि देखण्या वास्तूंनी हा परिसर नटलेला आहे. १९७२-७३ च्या काळात संपूर्ण विदर्भात महाविद्यालयांची संख्या शतक पार करून गेली. महत्त्वाच्या शहरांमध्ये, तालुक्याच्या गावीही महाविद्यालये उघडण्यात आली. १९७३ ते ८३ या दहा वर्षांच्या काळात संलग्न महाविद्यालयांची संख्या १३९ वर गेली. त्यावेळी विद्यापीठाच्या नियंत्रणात चार महाविद्यालय ३१ शैक्षणिक विभाग होते नोंदणीकृत विद्यार्थी ६३ हजार १४० तर एकूण परीक्षार्थींची संख्या १ लाख १३ हजार वर गेली होती. १ मे १९८३ ला नागपूर विद्यापीठामधून अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. त्यावेळी विदर्भाच्या आठ जिल्ह्यांपैकी चार जिल्हे अमरावती विद्यापीठाकडे गेले. जवळपास अर्धा भाग नागपूर विद्यापीठाच्या अखत्यारीतून गेला. ४ मे २००५ पासून नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला.

## संपादकीय »

### एक पाखरू भिरभिरते..

***पण नाधोंच्या कवितेतल्या निसर्गाला 'देह' आहे आणि तो देह त्यांची कविता नैसर्गिकपणे भोगतो. कवी म्हणून नाधों जे झाले ते तसेच समोर मांडतात..***

मराठी कवींची अडचण दुहेरी असते. एक म्हणजे एखाद्या कवितेचे जोपर्यंत लोकप्रिय गाणे होत नाही, तोपर्यंत त्या कवीकडे वाचकांचे म्हणावे तितके लक्ष जात नाही. आणि दुसरी अडचण अशी की एखाद्याच्या कवितेची फारच गाणी झाली तर तो कवी म्हणून कमअस्सल मानला जायला लागतो. या अडचणींतून फारच कमी कवी त्याच्या/तिच्या काव्यशीलावर एकही ओरखडा न उमटता सहीसलामत सुटतात. ना.धों. महानोर हे त्यातले एक. पण नाधोंना घराघरात नाव मिळवून दिले त्यानंतर बरोबर दहा वर्षांनी आलेल्या 'जैत रे जैत'ने. नाधोंचा मोठेपणा असा की ते 'जैत रे जैत'च्या आधीही कवी होते आणि नंतरही शेवटपर्यंत कवीच राहिले. जंगलातून, रानातून, मातीच्या रस्त्यातून, शेतीच्या बांधावरून, आबादानी करणाऱ्या पावसातून, जमिनीतून उगवणाऱ्या हिरव्या कोंबातून स्वत:चे स्वतंत्र घराणे निर्माण करणारा हा कवी आता आपल्यातून गेला.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ म्हणजे जनसामान्यांची लाडकी लालपरी एसटी अनेक समस्यांचा सामना करीत आहे. त्यातच गडचिरोली विभागातील अहेरी आगारातील एका छत उडालेल्या गाडीचा व्हिडिओ सोशल मीडियावर आला आणि पुन्हा एकदा टीका होऊ लागली. पण या मागची कारणे काय असतील, याचा विचार कुणीही करीत नाही. ज्या एसटीने गेली ७५ वर्षे प्रवाशांची अविरत विनाखंड वाहतूक केली.**

## 'छत उडाले' त्याची गोष्ट!

किंबहुना सेवा केली व जिचे राज्याच्या विकासात मोठे योगदान आहे; तीच एसटी आज टीकेचे लक्ष्य झाली आहे. अशी टीका करताना याची कारणे शोधली पाहिजेत. पण तसे होत नाही. अगदी सहज टीकाटिप्पणी केली जाते. पण खराब रस्ते व जुन्या खिळखिळ्या झालेल्या गाड्या हेच या लाल परीच्या दुर्दशेचे मूळ कारण आहे. सध्या एसटीमध्ये आयुर्मान व किलोमीटर पूर्ण झालेल्या जुन्या गाड्या ही सर्वांत मोठी समस्या आहे. एसटीकडे सध्या राज्यभरात अंदाजे १५ हजार पाचशे गाड्या असून यातील बहुसंख्य गाड्यांची धाव आठ लाख किलोमीटरपेक्षा जास्त तसेच आयुर्मान दहा वर्षांपेक्षा जास्त झाले आहे. पूर्वी अशा गाड्या वापरातून बाद केल्या जात. पण सन २०१७ पासून पुढे सहा वर्षे एकही गाडी खरेदी न केल्याने नाइलाजास्तव जुन्या खराब गाड्या वापरल्या जात आहेत. यंदा सातशे डिझल बस, पाचशे भाडेतत्त्वावरील



बस व १५० इलेक्ट्रिक बस एसटीच्या ताफ्यात नव्याने आल्या. पण महिला व ज्येष्ठ नागरिक यांना राज्य सरकारने सवलती दिल्याने प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. यामुळे, गाड्या कमी पडत आहेत. अशा वेळी आहेत त्याच जुन्या गाड्या तशाच वापराव्या लागत आहेत. या पूर्वीचा अनेक वर्षांचा काळ पाहिल्यास दर वर्षी साधारण दोन हजार किंवा त्यापेक्षा जास्त गाड्या नवीन खरेदी केल्या जात. जुन्या आठ लाख किलोमीटर धाव व दहा वर्षे पूर्ण झालेल्या गाड्या बाद केल्या जात. पण ही साखळी पद्धत हल्ली तुटत आहे. त्यामुळेच जुन्या व खिळखिळ्या गाड्या वापराव्या लागत आहेत. त्यामुळे दुरुस्तीसाठी अती श्रम व मनुष्यबळ लागत आहे. याशिवाय मोठ्या प्रमाणात सुटे भाग लागत आहेत. त्यांचा आर्थिक भार एसटीवर पडत आहे. खराब रस्ते व रस्त्यातील खड्डे या समस्येमुळेही एसटीचे खूप नुकसान होत आहे. खराब रस्त्यांमुळे वर्षाला अंदाजे सातशे कोटींचे नुकसान होत आहे. हा अंदाज जुनाच आहे. आता महागाईत वाढ झाल्याने त्यात अजून वाढ झाली असावी. महामंडळाच्या ७५ वर्षांच्या कारकीर्दीचा आढावा घेतला तर महामंडळाला राजकीय हस्तक्षेपामुळे व विविध सरकारांनी नीट अभ्यास करून वेळेवर निर्णय न घेतल्याने एसटीला खूप नुकसान सहन करावे लागले आहे. हे ही वारंवार विविध पाहण्यांमधून दिसून आले आहे. गडचिरोली विभागात अहेरी आगारातील ज्या छप्पर उडालेल्या गाडीबद्दल सध्या सर्वत्र टीकाटिप्पणी होत आहे; ती गाडी २०१३ मध्ये ताफ्यात आली. तिला १० वर्षे पूर्ण झाली व तिची नियतधाव पुरी झाली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी ।
मज आणि हरी वियोग तों ॥१॥

प्रसंगीं या नाहीं देहाची भावना ।
तेथें या वचना कोण मानी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मी घराणेशाहीचं प्रॉडक्ट आहेच!

## » भाजप काय करते; विरोधात गेलो तर आम्ही वाईट

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपाकडून कायमच आमच्यावर टीका करताना घराणेशाहीचा मुद्दा कायम पुढे केला जातो. मला ते मान्य आहे कारण मी स्वतः घराणेशाहीचं प्रॉडक्ट आहे. मी प्रतिभा शरद पवार यांची मुलगी आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या लोकसभेत बोलत होत्या.**

पुढे बोलताना सुळे म्हणाल्या की, आज मला भाजपाला एक प्रश्न विचारायचा आहे. घराणेशाहीचा मुद्दा तुम्ही उपस्थित करत असाल तर मग एनडीएची बैठक जेव्हा होते. तेव्हा जी. के. वासन, चिराग पासवान, प्रफुल पटेल, दुष्यंत चौटाला हे सगळे असतात. हे सगळे घराणेशाहीचं मेरिट सांगणारे नाहीत का? तुमच्या बरोबर असले तर मेरिट आणि आम्ही जर बरोबर असलो तर घराणेशाही असे कसे काय चालणार? असा सवाल उपस्थित करत त्यांनी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तर सरकार याचे उत्तर देणार का, असेही त्या म्हणाल्या. भाजपा खासदारांची, आमदारांची पहिली, दुसरी आणि तिसरी पिढी राजकारणात झाली तरीही चालतं. मात्र आम्ही केलं तर ती घराणेशाही असते. माझ्या मतदार संघात येऊन भाजपाच्या दिग्गज नेत्यांनी काय म्हटलं होतं?



### 4 वर्षे झाली तर निवडणुका नाहीत?

» जम्मू काश्मीर हे एक राष्ट्र होतं त्याचं रुपांतर तुम्ही तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये केले. त्यानंतर माननीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले होते एक वर्षात तिथे निवडणूक घेतली जाईल. आज 4 वर्षे झाली आहेत तिथे निवडणूक घेण्यात आलेली नाही. या सगळ्याला मनमानी म्हणायचं नाहीतर काय? असाही प्रश्न सुप्रिया सुळेंनी विचारला आहे.

NCP म्हणजे नॅचरली करप्ट पार्टी आहे. मला आता यांच्याकडून स्पष्टीकरण हवे आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्रात सत्तेत कशी काय? आम्ही तुमच्या बरोबर आलो तर आम्ही चांगले आणि विरोधात गेलो तर आम्ही वाईट असे मुळीच नसते. ही लोकशाही आहे, लोकशाहीत असे घडत नाही असेही सुप्रिया सुळेंनी म्हटले आहे. लोकसभेत दिल्लीतल्या सेवा विधेयकावर चर्चा होती त्यावेळी अनेक खासदारांनी भूमिका मांडली याच वेळी सुप्रिया सुळेंनीही आपली भूमिका मांडली आणि सरकारवर प्रश्नांच्या फैरी झाडल्या. हे सगळे आता नैतिकतेच्या गोष्टी करत आहेत, यांनी सांगितले दिल्लीच्या सचिवांना मारहाण झाली. जर तुमच्याकडून चूक झाली आहे. मीनाक्षी लेखींनी मांडलेल्या मुद्द्याशी मी सहमत आहे. मग महाराष्ट्रात काय झालं? तिथे अधिकाऱ्यालाही मारहाण झाली. तिथे तुमचे 105 आमदार आहेत. महाराष्ट्रातही अधिकाऱ्याला मारहाण झाली ती बाबही चुकीचीच आहे, असेही सुप्रिया सुळेंनी म्हटले आहे. भाजपाकडून 2014 आणि 2019 मध्ये आम्हाला पूर्ण बहुमत मिळाले आहे आणि आम्ही विजयी झालो आहोत याचा डंका वाजवला जातो. मग अरविंद केजरीवाल यांना एक नियम आणि केंद्राला एक नियम हा कुठला न्याय आहे. दिल्लीच्या जनतेने अरविंद केजरीवाल यांना कौल दिला आहे. तिथे राज्यपाल ढवळाढवळ करत आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या नाकर्तेपणाचा पुरावा

## » अनेक मोठे उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाल्यानंतर अनेक मोठे उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले आहेत. वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअरबस प्रकल्प, बल्क ड्रग पार्क असे अनेक प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेल्यानं विरोधी पक्षाने शिंदे-फडणवीस सरकारवर टीकास्त्र सोडलं होतं. यानंतर आता राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी संबंधित उद्योग महाराष्ट्राबाहेर कसे गेले, याची सविस्तर माहिती देणारी श्वेतपत्रिका जारी केली आहे.**

यावर आता ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी आक्षेप घेतला आहे. ही श्वेत पत्रिका म्हणजे शिंदे सरकारच्या नाकर्तेपणाचा पुरावा आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी प्रकाशित केलेल्या श्वेतपत्रिकेवर भाष्य करताना आदित्य ठाकरे म्हणाले, "खोके सरकारच्या नाकर्तेपणाची आणि उद्योग जगताचा सध्याच्या सरकारवर अजिबात विश्वास नसण्याची साक्ष देणारी 'श्वेतपत्रिका' आज प्रकाशित झाली. महाराष्ट्राबाहेर गेलेले चार मेगा प्रकल्प हा या श्वेतपत्रिकेचा विषय होता. मविआ सरकारच्या काळात जे उद्योग व प्रकल्प महाराष्ट्रात येण्यासाठी अंतिम टप्प्यावरची चर्चा करत होते. पण हे प्रकल्प महाराष्ट्रात बेकायदेशीर खोके सरकार येताच आणि त्यांच्या नेतृत्वाला भेटताच महाराष्ट्रातून तळ हलवून बाहेर गेले. श्वेतपत्रिका हा याचा ढळढळीत पुरावा आहे." आदित्य ठाकरे ट्वीटमध्ये पुढे म्हणाले की, श्वेतपत्रिकेतील बहुतेक तारखांमधून काही खणखणीत सत्य समोर येत आहेत: मिंधे-भाजपाचा महाराष्ट्राविषयीचा द्वेष आणि खोके सरकार स्थापन झाल्यावर उद्योग कसे दुसऱ्या राज्यात पाठवले गेले.

गद्दारांच्या टोळीने महाराष्ट्र राजकीयदृष्ट्या अस्थिर करण्याचा प्रताप केल्याने सद्य परिस्थितीवर उद्योग जगताचा महाराष्ट्रावर अजिबात विश्वास उरलेला नाही.

राज्यात दुर्दैवाने एक पूर्णपणे अकार्यक्षम बेकायदेशीर मुख्यमंत्री आहेत. ज्यांनी उद्योजकांच्या भेटींनंतर स्वहस्ते उद्योगधंदे राज्याबाहेर ढकलून दिले. श्वेतपत्रिकेत वेदान्त-फॉक्सकॉन, एअरबस-टाटा, बल्क ड्रग पार्क, सेफ्रॉन उद्योगांचा उल्लेख आहे. मात्र महाराष्ट्रापासून दूर ढकललेल्या इतर उद्योगांचा उल्लेख करण्यात आलेला नाही.



### माहितीशून्य उद्योगमंत्री : आदित्य

» "हा अहवाल महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आला होता की राज्याला एक नाकर्ता मुख्यमंत्री आणि माहितीशून्य उद्योगमंत्री आहे, हे सिद्ध करण्यासाठीच प्रकाशित केला? असा प्रश्न मला पडतोय. त्यांनी अधिकृतपणे मांडलेला रेकॉर्ड पाहता, दोघांनाही महाराष्ट्रासाठी काम करणाऱ्या मंत्रिमंडळात स्थानच मिळणार नाही. तसेच, खोके सरकारने सांगितल्याप्रमाणे 'वेदान्त फॉक्सकॉन' प्रकल्पापेक्षाही मोठा प्रकल्प महाराष्ट्रात येणार होता, त्या प्रकल्पाचा ह्या श्वेतपत्रिकेत उल्लेखही नाही.

# भिडे हे गुरुजी नाही तर शकुनी मामा!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

संभाजी भिडे यांची वक्तव्य तपासून त्यांच्यावर योग्य ती कारवाई होईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. यावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) गटाचे सचिन खरात यांनी संभाजी भिडे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. महाराष्ट्रात संभाजी भिडे सतत भडकाऊ विधान करताना दिसत आहेत. संभाजी भिडे शिव प्रतिष्ठान संघटनेच्या नावाखाली तरुणाची माथी भडकवण्याच काम राज्यात करताना दिसतात असे सचिन खरात यांनी म्हटले आहे. दरम्यान सचिन खरात पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात संभाजी भिडे सातत्याने भडकाऊ विधान करताना दिसत आहेत. संभाजी भिडे शिव प्रतिष्ठान संघटनेच्या नावाखाली तरुणाची माथी भडकवण्याच काम राज्यात करताना दिसतात. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रालाच नाही, तर भारताला समानतेचा विचार दिला. पण तो समानतेचा विचार सांगण्याऐवजी संभाजी भिडे तरुणांची माथी भडकवण्याच काम करताना दिसतात. ज्या प्रमाणे शकुनी मामा माथी भडकवण्याचे काम करायचा, तेच काम हे आधुनिक शकुनी मामा संभाजी भिडे करतायत. देवेंद्र फडणवीस आपणास एक विनंती आहे, संभाजी भिडे हे गुरुजी नसून, आधुनिक शकुनी मामा आहे, हे लक्षात घ्या, या शब्दांत सचिन खरात यांनी हल्लाबोल केला. सचिन खरात म्हणाले की, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रालाच नाही, तर भारताला समानतेचा विचार दिला. पण तो समानतेचा विचार सांगण्याऐवजी संभाजी भिडे तरुणांची माथी भडकवण्याच काम करताना दिसतात. ज्या प्रमाणे शकुनी मामा माथी भडकवण्याचे काम करायचा, तेच काम हे आधुनिक शकुनी मामा संभाजी भिडे करतायत अशी टीका सचिन खरात यांनी केली.देवेंद्र फडणवीस आपणास एक विनंती आहे, संभाजी भिडे हे गुरुजी नसून, आधुनिक शकुनी मामा आहे.

# दिल्ली विधेयक लोकसभेत मंजूर!

## » आप खासदार रिंकू उर्वरित अधिवेशनासाठी निलंबित

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**गुरुवारी म्हणजे 3 ऑगस्ट रोजी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा 11 वा दिवस होता. दिल्ली सेवा विधेयक लोकसभेत मंजूर झाले. त्याचवेळी सभापती ओम बिर्ला यांनी आप खासदार सुशील कुमार रिंकू यांना उर्वरित अधिवेशनासाठी निलंबित केले. रिंकूंना निलंबित करण्याचा प्रस्ताव संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आणला होता. वेलमध्ये पेपर फाडल्याचा आरोप रिंकूंवर होता.**



लोकसभेत दुपारी दोन वाजता दिल्ली अध्यादेश विधेयकावर चर्चा सुरू झाली. विरोधी पक्षांनी आघाडीचा विचार न करता दिल्लीचा विचार करावा, असे अमित शहा म्हणाले. एक मात्र नक्की की आपण कितीही आघाड्या केल्या तरी सरकार नरेंद्र मोदींच्याच हातात येईल. मणिपूरवर तुम्हाला हवी तेवढी चर्चा करा, मी उत्तर देईन, असेही शहा म्हणाले.

गृहमंत्री बोलल्यानंतर काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी म्हणाले की, शहा यांनी नेहरूंची केलेली स्तुती चांगली आहे. शहा म्हणाले की, मी स्तुती केली नाही. तुम्हाला तसे वाटत असेल तर तसे समजा. गुरुवारी सकाळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला सभागृहात पोहोचले नाहीत. ते नाराज असल्याचे सांगण्यात आले. 2 ऑगस्टलाही सभापती सभागृहात आले नाहीत. सकाळी 11 वाजता कामकाज सुरू होताच राजेंद्र अग्रवाल हे त्यांच्या जागेवर सभापतींच्या आसनावर बसले. काही वेळाने विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी यांनी अग्रवाल यांच्याशी बिर्ला यांच्याविषयी चर्चा केली. ते आमचे संरक्षक आहेत, आम्ही त्यांचे अनुपालक आहोत, त्यांनी परत यावे, असे आमचे आवाहन आहे.

यानंतर दुपारी 2 वाजताच्या कामकाजात ओम बिर्ला खुर्चीवर बसले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, काँग्रेस खासदार अधीर रंजन चौधरी, राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे, एनके प्रेमचंद्रन, बसपचे रितेश पांडे, भाजपचे राजेंद्र अग्रवाल, टीएमसी खासदार सौगता रॉय, राष्ट्रवादीचे खासदार फारुख अब्दुल्ला आणि द्रमुकच्या खासदार कनिमोझी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना सभागृहाच्या कामकाजात उपस्थित राहण्याचे आवाहन केले. गदारोळामुळे बिर्ला गेले दोन दिवस सभागृहात येत नव्हते. आजही लोकसभेत कामकाज होऊ न शकल्याने कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दिल्ली अध्यादेश विधेयकावर लोकसभेत चर्चा होणार आहे. डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन बिल देखील सादर केले जाणार आहे. मल्लिकार्जुन खर्गे यांनी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना विचारले की, मणिपूरच्या मुद्द्यावर चर्चेची मागणी करण्यासाठी तुम्ही पंतप्रधानांचा बचाव का करत आहात. यावर उत्तर देताना धनखड म्हणाले, 'मला पंतप्रधानांचा बचाव करण्याची गरज नाही. मी इथे कोणाचा बचाव करायला बसलो नाही. मी इथे संविधान आणि तुमच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी बसलो आहे. तुमच्या बाजूने असा प्रकार कौतुकास्पद नाही. राज्यसभेत सभापती जगदीप धनखड यांनी मणिपूरवर चर्चा करण्यासाठी सर्व खासदारांना दुपारी 1 वाजता आपल्या केबिनमध्ये बोलावले. बुधवारी या प्रकरणी विरोधकांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली होती. 01 ऑगस्ट रोजी संसदेत लोकसभेच्या व्यवसाय सल्लागार समितीच्या बैठकीत 8 ते 10 ऑगस्ट दरम्यान अविश्वास प्रस्तावावर चर्चा होईल, असा निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान मोदी 10 ऑगस्टला अविश्वास प्रस्तावाला उत्तर देण्याची शक्यता आहे.

### ओम बिर्ला सकाळी घरी पोहोचले नाहीत

» गुरुवारी सकाळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला सभागृहात पोहोचले नाहीत. ते नाराज असल्याचे सांगण्यात आले. 2 ऑगस्टलाही सभापती सभागृहात आले नाहीत. सकाळी 11 वाजता कामकाज सुरू होताच राजेंद्र अग्रवाल हे त्यांच्या जागेवर सभापतींच्या आसनावर बसले. काही वेळाने विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार अधीर रंजन चौधरी यांनी अग्रवाल यांच्याशी बिर्ला यांच्याविषयी चर्चा केली. ते आमचे संरक्षक आहेत, आम्ही त्यांचे अनुपालक आहोत, त्यांनी परत यावे, असे आमचे आवाहन आहे. यानंतर दुपारी 2 वाजताच्या कामकाजात ओम बिर्ला खुर्चीवर बसले.

# फक्त राम मंदिराच्या मुद्द्यावर विसंबून राहू नका

## » खासदारांच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा सूचक इशारा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**प्रत्येक राज्यसभा खासदाराने एकदा तरी निवडणूक लढवावी, भाजपा हा एक प्रभावी आणि युतीसाठी अनुकूल पक्ष असल्याचे खासदारांनी ठामपणे लक्षात आणून द्यावे, तसेच खासदारांनी फक्त राम मंदिर या एकाच मुद्द्यावर विसंबून न राहता त्यांच्या मतदारसंघात जाऊन प्रत्यक्षात काम केले पाहीजे", असे आणि इतर अनेक मुद्दे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खासदारांच्या बैठकीत मांडले आहेत.**



### 'सब का साथ, सब का विकास'

आंध्र प्रदेशमधील तेलगू देसम पार्टी आणि पंजाबमधील अकाली दल हे भाजपाच्या एनडीएमधील सर्वात जुने घटक पक्ष आहेत. ते सध्या एनडीएत सामील झाले नसले तरी त्यांनी युतीत सहभागी होण्यासाठी त्यांनी नकारही दिलेला नाही. एनडीएमध्ये सर्वात मोठा आणि प्रभावी पक्ष म्हणून भाजपा लहान पक्षांना फारसा सन्मान देत नाही, असे सांगितले जात होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या बैठकांमधून मोदी 'सब का साथ, सब का विकास' हा संदेश जपतान दिसत आहेत.

सोमवार (३१ जुलै) पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी एनडीए युतीमधील खासदारांच्या बैठका घेत आहेत. खासदारांच्या आत्मविश्वासाला बळ देण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. या बैठकांची सुरुवात करताना आपण तिसऱ्यांदा हमखास सत्तेत येणार, याचीही शाश्वती ते देत आहेत.

दक्षिणेतील राज्यांमध्ये कर्नाटक वगळता इतर राज्यात भाजपाकडे फारसे खासदार नाहीत. याठिकाणी भाजपा हा युतीमधील प्रभावी आणि अनुकूल भागीदार असल्याचे मोदी सांगत आहेत. त्यांनी खासदारांना संदेश देताना सांगितले की, भाजपा आपल्या मित्रपक्षांसोबत राज्यात सत्ता नसतानाही ठामपणे उभा राहतो. (तमिळनाडूमध्ये सत्ता नसतानाही भाजपाने अण्णाद्रमुक (AIADMK) पक्षाला पाठिंबा दिलेला आहे.) एनडीएची स्थापना होऊन आता २५ वर्ष होत आहेत. एनडीएची स्थापना कोणत्याही एका व्यक्तीचा विरोध करण्यासाठी झालेली नाही, तर ती विशिष्ट उद्देश नजरेसमोर ठेवून झालेली आहे. तर विरोधकांची 'इंडिया' आघाडी केवळ मोदींना रोखण्यासाठी झालेली आहे, असेही पंतप्रधान मोदी बैठकीत बोलल्याची माहिती सूत्रांनी दिली. सोमवारी पश्चिम उत्तर प्रदेशमधील खासदारांसोबत पहिली बैठक संपन्न झाली. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी भाजपा कसा आघाडीधर्म पाळतो, याचे दाखले त्यांनी दिले. २०२० साली बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या जेडीयूपेक्षा जास्त जागा जिंकून आल्या तरी नितीश कुमार यांना मुख्यमंत्री पद देऊ केले. तसेच महाराष्ट्रात भाजपाकडे दुप्पट जागा असतानाही शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले. तसेच पंजाबमध्ये अनेक वर्ष अकाली दलासमवेत सत्तेत भागीदार असताना भाजपाने कधीही उपमुख्यमंत्रीपदावर दावा केला नाही, अशी माहिती त्यांनी दिली. पूर्व उत्तर प्रदेशमधील खासदारांना संबोधित करत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "राम मंदिर निर्माणाच्या आंदोलनाचा उगम भाजपा ज्या विचारधारेवर विश्वास ठेवतो, त्या विचारसरणीतून झालेला आहे आणि आपण हा विषय अखेरपर्यंत घेऊन जाणार आहोत. असे असतानाही आपण फक्त राम मंदिर या एकाच विषयावर विसंबून राहून जिंकू शकत नाहीत, आपण आत्मसंतुष्ट होता कामा नये.

# आज तो गुलाबगंज मैं आग लगेगी !

ज्यांनी शोर इन द सिटी, द फॅमिली मॅन आता काही महिन्यांपूर्वी आलेली फर्जी नावाची वेबसीरिज पाहिली असेल त्यांना राज अँड डीके कोण आहेत हे नव्यानं सांगण्याची गरज नाही. आता त्यांच्या गन्स अँड गुलाब्स नावाच्या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून त्याची चर्चा सुरु झाली आहे. सोशल मीडियावर त्या चित्रपटाच्या ट्रेलरनं लक्ष वेधून घेतले आहे. गन्स अँड गुलाब्स मध्ये राजकुमार राव, दकलीर सलमान, आदर्श गौरव आणि गुलशन देवांश नावाच्या कलाकारांची या चित्रपटामध्ये मुख्य भूमिका असून तो नेटफ्लिक्सवर येत्या १८ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. त्याच्या ट्रेलरला आतापर्यत प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला आहे. ८० च्या दशकांतील मारधाटपटांची आठवण करुन देणारा हा ट्रेलर आहे. अमिताभ, धर्मेंद्र, मिथून यांच्या त्या इरसाल चित्रपटांच्या धर्तीवर वेगळ्या विषयावर आधारित गन्स अँड गुलाब्सचे संवाद मात्र भलतेच बोल्ड आहे. त्यात शिव्यांचा भडिमार आहे. गँगस्टर आणि त्यांच्या आपआपसातील लढाया, दुसरीकडे गुंडांच्या रोमँटिक स्टोरीज असा सर्वसाधारण बाज या चित्रपटाचा दिसून येतो आहे. त्यावर आलेल्या नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया भलत्याच तिखट आणि मजेशीर आहेत. गुलाबगंज नावाच्या एका काल्पनिक शहरामध्ये गन्स आणि गुलाब्सची कथा घडते. दिग्दर्शक राज अँड डीके या कथेला थोडासा रेट्रो लूक देण्याचा प्रयत्न केला आहे. कलाकारांचा मेकअप, त्यांची हेअर स्टाईल, त्यांची वेशभूषा हे सारं कमाल आहे. जोडीला जुन्या हिंदी गाण्याचे बीजेएम आहे. त्यानं वेगळीच वातावरण निर्मिती झाल्याचे दिसून येते. काही तासांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या ट्रेलरनं आता नेटकऱ्यांना घायाळ केले आहे. दिवंगत अभिनेते सतीश कौशिक यांची भूमिका असलेला गन्स अँड गुलाब्स हा शेवटचा चित्रपट आहे. त्यामुळे त्याचे महत्वही असाधारण आहे. त्यांनी आदर्श गौरवच्या वडिलांची भूमिका साकारली आहे. साधारण १९८० च्या सुमारास घडणाऱ्या या कथानकामध्ये कलाकारांनी मात्र कमाल केली आहे.

# मैं निकला गड्डी लेके...!

बॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता सनी देओलच्या गदरचा ट्रेलर आता समोर आला आहे. तो प्रेक्षकांच्या कौतूकास पात्र ठरला आहे. तब्बल २३ वर्षांनी गदरचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सनी देओल, अमिषा पटेल यांची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटातील मैं निकला गड्डी लेके प्रसिद्ध गाण्यानं चाहत्यांना भुरळ घातली आहे. सनीनं वयाची साठी पार केली आहे. अमिषा चाळीशीच्या घरात आहे. गदरच्या पहिल्या भागात या दोन्ही कलाकारांनी कमाल केली होती. त्यातील त्यांच्या अभिनयानं गदरला बॉक्सऑफिसवर मोठं यश मिळवलं होतं. सनीनं तारासिंगची भूमिका साकारली होती. तो पाकिस्तानात जाऊन त्याची प्रियसी सकीनाला भारतात घेऊन येतो. मात्र या दरम्यान त्याला वेगवेगळ्या संकटांचा सामनाही करावा लागला होता. आता सनीच्या गदर २ मधील मैं निकला गड्डी लेके नावाचे गाणे व्हायरल झाले आहे. जुन्या गदर मधील हे गाणे नव्या रुपात आणि ढंगात सादर करण्यात आले आहे. त्यात सनीचा आणि अमिषाचा लूक मात्र लक्षवेधी आहे. यामध्ये सनी ट्रकमध्ये नव्हे तर बुलेटवर सफारी करत असल्याचे दिसते आहे. अमिषा अजूनही तारासिंगची तितक्याच उत्कटतेनं वाट पाहते. असा तो प्रसंग चाहत्यांना प्रतिक्रिया देण्यास भाग पाडताना दिसत आहे. त्या गाण्यामध्ये सनी, अमिषा आणि उत्कर्ष शर्मा हे दोघेही दिसत आहे. त्या गाण्याचा बाजही पहिल्या गाण्यापेक्षा वेगळा आहे. मैं निकला गड्डी लेकेच्या रिप्राईज्ड व्हर्जनला चाहत्यांनी स्विकारले आहे. त्याला जोरदार प्रतिसादही मिळाला आहे. ते चाहत्यांच्या प्रतिक्रियांवरुन कळून येते. अवघ्या काही तासांपूर्वी प्रदर्शित झालेल्या त्या गाण्याला लाखो व्ह्युज मिळाले आहेत. त्या गाण्यामध्ये सनी आणि अमिषा पटेल यांच्यात एक रोमँटिक सीन दाखवला आहे. तो चाहत्यांचे लक्ष वेधून घेतो आहे. मैं निकला गड्डी लेके हे मुळ गाणे उदित नारायण यांनी गायले असून नवीन व्हर्जनमध्ये ते त्यांचा मुलगा आदित्य नारायणनं गायलं आहे. तर शबीना खाननं या गाण्याची कोरिओग्राफी केली आहे. सनी आणि उत्कर्ष शर्मावर आधारित या गाण्यामध्ये उत्कर्षसाठी आदित्यनं आवाज दिला आहे.



# लोकांना माझी श्रीमंती दिसते

बॉलीवूडमध्ये नोरा आली आणि बॉलीवूडचा चेहराच बदलून गेला. वेगळ्या डान्स पर्वाला सुरुवात झाली. बॉलीवूडची प्रसिद्ध आयटम गर्ल म्हणून नोराचे नाव घेतलं जाऊ लागले. केवळ भारतातच नाहीतर जगभरामध्ये नोराच्या डान्सचे शो होऊ लागले. काही दिवसांपूर्वी तिची वर्ल्ड टूर झाली. त्याला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. नोराचा सोशल मीडियावर चाहतावर्ग मोठा आहे. तिला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. नोराच्या वेगवेगळ्या लूकसवर चाहते फिदा होतात. त्या फोटोंवर दिलखुलासपणे व्यक्तही होतात. सध्या नोरा टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अशा रियॅलिटी शो मध्ये परिक्षकाच्या भूमिकेत आहे. याशिवाय आगामी काळात ती बॉलीवूडच्या मोठ्या प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. नोरा ही वेगवेगळ्या कारणांमुळे ट्रोलही होताना दिसते. सुकेश चंद्रशेखरनं केलेल्या हजारो कोटींच्या घोटाळ्यात नोराचं नाव आल्यानं तिची डोकेदुखी वाढली आहे. तिला पटियाला कोर्टानं हजर राहण्याचे आदेशही दिले होते. यासगळ्यात नोरावर सोशल मीडियातून तीव्र शब्दांत नेटकऱ्यांनी टीका केली. त्यामुळे व्यथीत झालेल्या नोरानं एका मुलाखतीतून टीका करणाऱ्यांना चांगलेच सुनावले आहे. बॉलीवूडमध्ये गेल्या सहा ते सात वर्षांपासून सतत सेलिब्रेटी म्हणून मिरवणाऱ्या नोरानं सांगितले की, चाहत्यांना माझे सेलिब्रेटीपद दिसते. माझी श्रीमंती दिसते, माझ्या सौंदर्यावर ते भाळतात पण नोरा कोण होती, ती कुठून आली याविषयी त्यांना काहीही माहिती नाही. नोरा कोणत्या गल्लीबोळात राहायला होती हे त्यांना ठाऊक नाही. नोरानं खूप संघर्ष केला आहे. सुरुवातीपासून माझा प्रवास खूपच कष्टाचा राहिला आहे. नेटकऱ्यांना काहीही माहिती नसताना कोणत्याही गोष्टींवरुन टीका करतात तेव्हा वाईट वाटते.



सलमान खानच्या बजरंगी भाईजान चित्रपटातील मुन्नी फेम अभिनेत्री हर्षाली मल्होत्रा हिने तिचा एक डान्स व्हिडिओ चाहत्यांसोबत शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये हर्षालीने 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' चित्रपटातील 'व्हाट झुमका' हे गाणे रिक्रिएट केले आहे. करण जोहरच्या या चित्रपटात रणवीर सिंग आणि आलिया भट्ट मुख्य भूमिकेत आहेत. व्हिडिओमध्ये हर्षाली लाल रंगाच्या ड्रेसमध्ये दिसत आहे. तिने रणवीर आणि आलियाच्या हुक स्टेपची कॉपी केली आहे. हा व्हिडिओ तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'ट्रेंड के साथ जा रहे हैं.. व्हाट झुमका?'. हर्षालीचा हा डान्स व्हिडिओ चाहत्यांना आवडला आहे.

# हर्षाली चा 'व्हॉट झुमका'

# RCB संघात मोठा बदल!

## » लखनऊ सुपर जायंट्सच्या प्रशिक्षकाची आरसीबीमध्ये एन्ट्री

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली।
वृत्तसंस्था

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने त्यांच्या पहिल्या आयपीएल विजेतेपदासाठी तयारी सुरू केली आहे. गेल्या १६ हंगामात संघाला एकदाही ट्रॉफी जिंकता आलेली नाही. गेल्या मोसमात हा संघ प्लेऑफसाठीही पात्र ठरू शकला नव्हता. याचा ठपका मुख्य प्रशिक्षक संजय बांगर आणि संघ संचालक माईक हेसन यांच्यावर आहे. आरसीबी फ्रँचायझीने हेसन आणि बांगर यांना बडतर्फ केले आहे. झिम्बाब्वेचे माजी खेळाडू आणि लखनौ सुपर जायंट्सचे मागील मोसमाचे मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांची संघाचे नवे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**



अँडी फ्लॉवर नुकतेच लखनौ सुपरजायंट्स मुख्य प्रशिक्षकपदावरुन पायउतार झाले होते. त्यांच्या जागी जस्टिन लँगर लखनऊचे मुख्य प्रशिक्षक बनले. अशा परिस्थितीत अँडीला आता आरसीबीचे मुख्य प्रशिक्षक बनवण्यात आले आहे. अँडी फ्लॉवरचे स्वागत करताना आरसीबीने सोशल एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये लिहिले की, “आम्ही आयसीसी हॉल ऑफ फेमर आणि इंग्लंडचे टी-२० विश्वचषक विजेते प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांचे स्वागत करतो.

आयपीएल आणि जगभरातील अनेक टी-२० संघांना प्रशिक्षण देण्याचा आणि पीएसएल, आयएलटी-२०, द हंड्रेड आणि अबू धाबी टी-१० मध्ये त्याच्या संघांना विजेतेपद मिळवून देण्याचा अँडीचा अनुभव आरसीबीला विजेतेपद मिळवून देऊ शकतो. त्यांची विजयी मानसिकता आरसीबीला पुढे जाण्यास मदत करेल. आरसीबीने हेसन आणि बांगरसाठी देखील पोस्ट केली आहे. त्यामध्ये त्यांनी लिहिले, “टीम डायरेक्टर म्हणून माईक हेसन आणि मुख्य प्रशिक्षक म्हणून संजय बांगर यांनी केलेल्या प्रशंसनीय कामाबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. त्यांची व्यावसायिकता आणि कामाची नैतिकता नेहमीच पाहिली जाते. गेल्या चार वर्षांत त्यांनी अनेक तरुणांना शिकवून यशस्वी होण्यासाठी व्यासपीठ दिले आहे. आता तो आणि संघ वेगळे होत असताना, आम्ही संजय आणि हेसन यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा

### कर्णधारपदातही बदल होणार?

» बांगर आणि हेसन २०२० पासून आरसीबी संघाशी संबंधित आहेत. २०२० आणि २०२१ मध्ये जिथे संघ चौथ्या स्थानावर होता. त्याच वेळी, २०२२ मध्ये, आरसीबीने तिसरे स्थान मिळविले. २०२३ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ प्लेऑफसाठी पात्र ठरू शकला नाही. आता अँडी फ्लॉवरवर संघाला प्रथमच चॅम्पियन बनविण्याची तसेच योग्य प्लेइंग इलेव्हन निवडण्याची जबाबदारी असेल. फ्लॉवरला कोचिंगचा खूप अनुभव आहे. मात्र, व्यवस्थापनात बदल झाल्यास कर्णधारपदातही बदल होणार का, हे पाहायचे आहे.

# सिंधू, श्रीकांत, प्रियांशू उपांत्यपूर्व फेरीत

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

भारताची दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधू, माजी जागतिक नंबर-1 किदाम्बी श्रीकांत आणि प्रियांशू राजावत यांनी ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटन चॅम्पियनशिपच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. या तिघांनी दुसऱ्या फेरीत सरळ गेममध्ये सामना जिंकून पुढील फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

सिंधूने देशभगिनी आकर्षी कश्यपचा 21-14, 21-10 असा पराभव केला. सिंधू आणि आकर्षी पहिल्यांदाच भिडले. सिंधूने आपल्या अनुभवाचा पुरेपूर वापर करून आकर्षीला 29 मिनिटांत सहज हरवून पुढच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. आता उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा सामना या स्पर्धेतील चौथा मानांकित मलेशियाच्या बेवेन झांगशी होणार आहे. बेवेनने दुसऱ्या फेरीत हुआंग यू-सनचा 19-21, 21-10, 21-12 असा पराभव करून तिसरी फेरी गाठली. दुसऱ्या फेरीत श्रीकांतने चायनीज तैपेईच्या सु ली यांगचा 21-10, 21-17 असा पराभव केला. तत्पूर्वी, त्याने पहिल्या फेरीत जपानच्या केंटा निशिमोटोचा 21-18, 21-7 असा पराभव केला.

आता पुढील फेरीत त्याचा सामना प्रियांशू राजावतशी होणार आहे. राजावतने दुसऱ्या फेरीत चायनीज तैपेईच्या वांग त्झू वेईचा 21-8, 13-21, 21-19 असा पराभव केला.



# टीम इंडियाच्या व्यवस्थापकाचे निधन

## » वयाच्या 75व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे (डीडीसीए) माजी सचिव सुनील देव यांचे बुधवारी दीर्घ आजाराने निधन झाले. वयाच्या ७५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी व मुले असा परिवार आहे. ७० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून ते २०१५ पर्यंत डीडीसीएमध्ये असलेल्या देव यांनी बीसीसीआयच्या विविध उपसमित्यांवरही काम केले आहे. महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखालील २००७ टी-२० विश्वचषक चॅम्पियन संघाचे व्यवस्थापकही होते.**



१९९६ च्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यात आणि २०१४ च्या इंग्लंड दौऱ्यात ते भारतीय संघाचे प्रशासकीय व्यवस्थापक होते. जन्मजात व्यंगचित्रकार देव यांनी डीडीसीएसाठी अनेक वर्षे काम केले आहे. देव यांनी डीडीसीएचे चांगले आणि वाईट अधिक स्पष्टपणे समोर आणले. डीडीसीएमधील विविध धोरणात्मक मुद्द्यांवर आपली विरोधाभासी मते मांडण्यास त्यांनी कधीही संकोच केला नाही. अशा प्रकारे त्यांना त्यांच्या कार्यकाळात मित्र आणि शत्रू दोन्ही समान प्रमाणात आढळले. सुनील देव यांचा दिल्ली क्रिकेटमधील दबदबा यावरून कळू शकतो की १९९० ते २००० दरम्यान एक काळ असा होता की, त्यांच्या शिक्काशिवाय रणजी ट्रॉफी किंवा कोणत्याही वयोगटातील संघाची घोषणा केली जात नव्हती. त्यांच्या “द ग्रेट तमाशा” या पुस्तकात ‘द इकॉनॉमिस्ट’चे आशिया संपादक प्रख्यात पत्रकार जेम्स ॲस्टिल यांनी सुनील देव यांच्याशी झालेल्या त्यांच्या भेटीची आणि सामन्याच्या तिकीट विक्रीबद्दल बरेच काही सांगितले होते, ज्यामुळे त्यांना धक्काच बसला.

### पत्रकारांशी चांगले जमायचे

सुनील देव यांच्या कार्यशैलीबद्दल अनेक मनोरंजक कथा आहेत, परंतु काही काळाच्या ओघात शहरी मिथक बनल्या आहेत. जेव्हा ते पत्रकारांसोबत रिलॅक्स मूडमध्ये असत तेव्हा ते त्यांना मजेदार किस्से सांगत असत. विराट कोहली नावाचा १७ वर्षांचा मुलगा त्याच्या SUV मधून ड्रायव्हिंग कसा शिकला, हेही त्यांनी सांगितले.